Total No. of Printed Pages: **06** No. of Questions : **50**

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chhatrapati Sambhajinagar**
**PET 2024 (9002) Doctor of Philosophy (Dramatics)**

(To be filled by the Candidate)

Candidate Seat Number
(As per Admit card)

OMR Sheet Number

Invigilator's signature with Date

Candidate's Seat No. in Words :______________________

Name of the Center :______________________

Paper Code & Name of Examination : **9002- Doctor of Philosophy (Dramatics)**

Date: **03/10/2024** **PET 2024 - EXAMINATION**

Time: **One Hours** Total Marks: **100**

**Important Instructions for the candidate**

1. Write your seat number and OMR Sheet number on the question paper in the earmarked space
2. This question paper carries Fifty (50) Multiple-choice type questions and each question carries 2 Marks
3. At the commencement of examination, the question paper will be given to the student.
4. Each question has four alternative responses marked (A) (B) (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each question
   Example: where (C) is correct answer

   (A) (B) ● (D)

5. Your responses to the answer are to be indicated in the OMR Sheet. If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet it will not be evaluated.
6. Rough work is to be done at the end of this question paper.
7. You have to return OMR answer sheet and question paper to the invigilator at the end of examination compulsorily and must not carry with you outside the examination hall.
8. Use only Black / Blue ball point pen
9. Use of any type of calculator or log table etc. is prohibited.
10. There is no negative marking for incorrect answers

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात तसेच आपणास दिलेल्या उत्तर पत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. या प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्न सोडवणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A) (B) (C) (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत, त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा निळा करावा.
   उदा: जर (C) हे उत्तर योग्य असेल तर

   (A) (B) ● (D)

5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे ओएमआर उत्तर पत्रिकेतच दर्शवावीत इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. प्रश्नपत्रिकाच्या शेवटी कोऱ्या जागेवरच कच्चे काम करावे
7. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी मूळ ओ. एम. आर उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे परत करणे आवश्यक आहे तथापि प्रश्नपत्रिका व ओ. एम. आर. उत्तरपत्रिका आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्याला परवानगी नाही.
8. फक्त काळ्या किंवा निळ्या बॉलपेनचाच वापर करावा
9. कॅल्क्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही
10. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही

**Q. No.** **Question**

**1.** 'नागानंद' नाटक-

**(A)** हर्ष **(B)** शूद्रक
**(C)** विशाखादत्त **(D)** अभिनवगुप्त

**2.** रंगमंचावर चालणाऱ्या पात्राच्या--- मुळे त्याच्या बाह्य हालचाल आणि कृतीला'अर्थ प्राप्त होतो.

**(A)** शाब्दिक संवाद **(B)** हालचाल
**(C)** बाह्यकृती **(D)** आंतरिक कृती

**3.** ग्रीक रंगभूमीवरील युद्धाच्या विरोधी विचार मांडणारे नाटक-

**(A)** इडिपस **(B)** बर्ड्स
**(C)** लीसिस्ट्राटा **(D)** अगेमेम्नॉन

**4.** 'कन्स्ट्रक्टिव्हिजम' ही संकल्पना मेअरहोल्डने नाटकातून -----साठी उपयोगात आणली.

**(A)** नाट्यलेखन **(B)** रंगमंचावरील पडद्यासाठी
**(C)** नटांच्या प्रवेशासाठी **(D)** नेपथ्य

**5.** ऍरिस्टोटलप्रणीत रंगभूमीवरील नाटकातून नाट्यात्मकता हा महत्वपूर्ण घटक आहे,ज्यात ------आढळते.

**(A)** प्रत्यक्षाता-जीवनसदृशता **(B)** भूतकालीनत्व -परिणाम
**(C)** दुरीभवन **(D)** नात्यांचे भावसंकेत परिणाम

**6.** रिचर्ड वॅग्नर यांचा विरोध होता-

**(A)** अतिवास्तववादाला **(B)** अभिजातवादाला
**(C)** अभिव्यक्तीवादाला **(D)** वास्तववादाला

**7.** स्वच्छंदतावादी नाट्यशैली ------याना महत्व देते.

**(A)** परावलंबित्व-चाकोरीबद्धता आणि त्यातून मिळालेली प्रेरणा
**(B)** निसर्गशक्ती-स्वप्रेरणा आणि आत्मनिष्ठता
**(C)** तत्कालीन घटनादर्शन दिशा दृष्टिकोन
**(D)** वास्तववादी दृष्टिकोन आणि नाट्यात्मकता

**8.** इटालियन रंगभूमीवरील अवाङ्मयीन नाट्यप्रवाह -

**(A)** कॉमेदिआ-देल्लार्ते **(B)** ऑपेरा
**(C)** काबुकी **(D)** पास्टोरल ड्रामा

**9.** पात्राचे स्वभाव विशेष म्हणजे --

**(A)** स्थायीभाव **(B)** प्रवृत्ती
**(C)** आकाशीका **(D)** आलंबन विभाव

**10.** पात्रांच्या चेष्टांद्वारे भौगोलिक आणि भौतिक वातावरणाच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारा अभिनय-

**(A)** सात्विक अभिनय **(B)** मूकाभिनय
**(C)** आंगिक अभिनय **(D)** आहार्य अभिनय

**11.** हसत हसत गुढार्थयुक्त भाषण करणे म्हणजे-

(A) वाक्केली
(B) भारती
(C) प्रहसन
(D) नालिका

**12.** सर्वप्रकारची वाद्ये वाजवण्यात कुशल आणि नाचणारांचा मुख्य म्हणजे-

(A) सूत्रधार
(B) वादक
(C) तौरीप
(D) तंडू

**13.** सूत्रधाराने आपल्या भाषणाचा ओघ असा आणावयाचा की,त्या भाषणातील एखादे वाक्य तसेच किंवा अर्थरूपाने घेऊन प्रथम पात्राने प्रवेश करावा किंवा प्रथम येणाऱ्या पात्रास प्रवेश करता यावा म्हणजेच---होय.

(A) कथोद्धात
(B) आरंभ
(C) प्रयोगातीशय
(D) निर्वहण

**14.** अनेक व्यक्तींनी मिळून कारवायांचे नृत्तास ---म्हणतात.

(A) तांडव
(B) समूहनृत्य
(C) भेदयकबंध
(D) पिण्डि

**15.** 'संशोधन म्हणजे नवीन ज्ञान मिळवण्यासाठी केले जाणारे पद्धतशीर प्रयत्न होय'--

(A) लेहमन- म्युरि
(B) न्यु सेन्च्युरी
(C) हेरिंग
(D) जे.डब्ल्यू.बेस्ट

**16.** --- याबद्दल निश्चिती झाल्यावर संशोधनासाठी योग्य पद्धती कोणती याचा विचार संशोधकाला करावा लागतो.

(A) निष्कर्ष
(B) विश्लेषण
(C) गृहीतकृत्य
(D) मूल्यमापन

**17.** विशिष्ट विषयात अभ्यास करण्याची गरज का भासावी याचे संशोधन आराखड्यात महत्व सांगणारा घटक म्हणजे -

(A) संशोधन प्रकार
(B) उद्दिष्ट्ये
(C) संकलन
(D) संदर्भ

**18.** काकड्या व संबळया प्रकार -

(A) गवळण
(B) पोवाडा
(C) गोंधळ
(D) भराड

**19.** देवाशी विधिपूर्वक लग्न लावून देवभक्तीचे व्रत अंगिकारलेले असताना एखाद्या वाघ्यासोबत राहणे म्हणजे -

(A) गौळण
(B) झुलवा
(C) नर्तिका
(D) नाच्या

**20.** स्त्री रूप धारण करून लक्ष्मीआईचा बाना अंगावर घेऊन मागतेपणाने जीवन जगणे म्हणजे-

(A) खंडोबा
(B) बिरोबा
(C) पोतराज
(D) वाघ्या

**21.** पूर्वरंगाशी जोडलेले कथासूत्र साकार करताना देशकाल परीस्थितीनुसार त्यात वर्तमानकालीन संदर्भ आणून कथन दर्शनाची अभिव्यक्ती म्हणजे-

(A) नाट्य
(B) शाहिरी
(C) पोवाडा
(D) कीर्तन

**22.** गोंधळ हा कुलाचार पार पाडणारे-
(A) मुरळी
(B) वाघ्या
(C) गोंधळी
(D) शाहीर

**23.** कोकण व गोव्यात प्रचलित असणारे-
(A) दंडार
(B) पोवाडा
(C) दशावतार
(D) वेताळक

**24.** रोमांच,अश्रू ,कंप या गुणांनी युक्त असा अभिनय प्रकार-
(A) सात्विक अभिनय
(B) चित्राभिनय
(C) मूकाभिनय
(D) वाचिक अभिनय

**25.** रंगमंचीय सादरीकरणात ग्रोटोवस्की यांनी -
(A) प्रामुख्याने नट आणि प्रेक्षक यांच्या परस्परानुवर्ती जीवंत अनुबंधावर विशेष भर राहील यावर काम केले.
(B) प्रामुख्याने प्रेक्षक आणि दिग्दर्शक यांच्या परस्परानुवर्ती अनुबंधावर विशेष काम केले.
(C) प्रामुख्याने नाटककार आणि नाट्यसंहिता यातील रंगसूचना यांच्या संकेतांवर काम केले.
(D) प्रामुख्याने नेपथ्य आणि प्रकाशयोजना नाट्यप्रयोगात भरपूर असले पाहिजे याबद्दलचे महत्व सांगितले.

**26.** ग्रीक-संस्कृत रंगभूमीद्वारे-
(A) साधारणपणे प्राचीन मिथकांचा आधार घेऊन त्यातून धार्मिक आणि सामाजिक जीवनमूल्यांतून प्रेक्षकांवर जीवनाच्या नैतिक बोधाचा संस्कार बिंबवण्याचा प्रयत्न केला.
(B) साधारणपणे प्राचीन मिथकांचा फारसा आधार न घेता केवळ धार्मिक आस्था आणि सामाजिक मूल्यांतून प्रबोधन केले जाते.
(C) प्राचीन मिथकांचा आधार घेऊन त्यातून प्रेक्षकांनुवर्ती मनोरंजन आणि करमणूक होईल असे प्रयत्न केले गेले.
(D) प्राचीन मिथकांना वगळून वर्तमानातील घटना प्रसंगांना स्थान देऊन त्याद्वारे प्रेक्षकांना सांस्कृतिक मुख्य प्रवाहात सामावून घेण्याचे काम केले.

**27.** कॉमेडीआ- देल्लार्ते या नाट्य सादरीकरणातून मूकनाट्य,शब्द किंवा नृत्य यातून हास्य निर्माण करावयाच्या पूर्वनियोजित क्लृप्तीला अथवा रचनेला --- म्हणतात.
(A) कॅपटिनो
(B) लाझी
(C) हार्लेक्वीन
(D) झेनि

**28.** 'संसारगाथा' नाटकाचे लेखक-
(A) विजय तेंडुलकर
(B) अजित दळवी
(C) जयवंत दळवी
(D) प्रशांत दळवी

**29.** .... यांनी सायको टेक्निक हा अभिनयाचा सिद्धांत मांडला.
(A) स्तानिस्लावस्की
(B) मेयरहोल्ड
(C) ब्रेख्त
(D) पीटर ब्रुक

**30.** स्थायिभावांपोटी उद्भवणाऱ्या प्रासंगिक व अल्पकालिक अशा मानसशरीर भावावस्था म्हणजे-
(A) संचारलेला आविर्भाव
(B) संचारलेले सोंग
(C) संचारी भाव
(D) भाव अवस्थेचा संचार झालेले असे काही

**31.** भारती वृतीचा संबंध या घटकाशी असतो
- **(A)** शाब्दिक भाषा
- **(B)** आंगिक हालचालींची भाषा
- **(C)** रेषांची भाषा
- **(D)** रंगांची भाषा

**32.** हालचालींच्या प्रमुख लक्षणांमध्ये खालीलपैकी _______ चा समावेश होत नाही.
- **(A)** ताल
- **(B)** विराम
- **(C)** गती
- **(D)** दिशा

**33.** 'द होली एक्टर' हि संकल्पना मांडणारा दिग्दर्शक -
- **(A)** अन्तोनिन आर्तो
- **(B)** पीटर ब्रुक
- **(C)** जझीं ग्रोटोस्की
- **(D)** कॉन्स्टाटिन स्टॅनिस्लावस्की

**34.** लवचिकता हा विशेष असणारी रंगभूमी
- **(A)** प्लास्टिक रंगभूषेचा उपयोग करणारी रंगभूमी
- **(B)** लोकरंगभूमी
- **(C)** फिरता रंगमंचाचा उपयोग करणारी रंगभूमी
- **(D)** नेपथ्यातील बदल सहज घडवू शकणारी

**35.** नाट्यधर्मी परंपरेशी निगडित रंगभूमी -
- **(A)** संस्कृत रंगभूमी
- **(B)** सुसंस्कृत नाटककारांची रंगभूमी
- **(C)** संस्कृत भाषा समजणारे नटांची रंगभूमी
- **(D)** संस्कृत भाषा अभिव्यक्त करणारी रंगभूमी

**36.** हालचालींची दिशा हि नेहमीच ______ शी निगडित असते.
- **(A)** रंग
- **(B)** नेपथ्य
- **(C)** रंगभूषा
- **(D)** वस्तू

**37.** रफ थिएटर म्हणजे -
- **(A)** लोक रंगभूमीवरील उस्फुर्त आविष्कार
- **(B)** असंस्कृतपणाचा उस्फुर्त आविष्कार
- **(C)** कमानी रंगमंचावरील उस्फुर्त आविष्कार
- **(D)** लोक रंगभूमीवरील नाट्य लेखनाचा उस्फुर्त आराखडा

**38.** मेयर होल्डचा नाट्य सादरीकरणा विषयीचा कल या दिशेला जाणारा होता -
- **(A)** नाटकीयवाद
- **(B)** निसर्गवाद
- **(C)** अभिजातवाद
- **(D)** नवअभिजातवाद

**39.** पात्रांचा ठराविकपणा व साचेबद्धपणा हे या नाट्याचे वैशिष्ट्य आहे.
- **(A)** शेक्सपिअरचे नाटक
- **(B)** ग्रीक नाटक
- **(C)** कॉमेदीआ - देलार्त
- **(D)** निसर्गवादी नाटक

**40.** बरटोल्ड ब्रेख्तने त्याच्या नाट्य लेखनातून वापरले -
- **(A)** भुतांच्या कथा
- **(B)** भूतकालीन विज्ञान
- **(C)** भूतकालीन तत्व
- **(D)** पूर्वजांचे आचार नियम

**41.** 'द थिएटर अँड इट्स डबल' या पुस्तकाचे लेखन केले .
- **(A)** हेनरीक इब्सेन
- **(B)** आंतोनिन आर्तो
- **(C)** ऑगस्तो बोल
- **(D)** पीटर ब्रूक

**42.** नाट्यलेखन आणि सादरीकरण यातून अपरिचितता हे वैशिष्ट्य असणारा नाट्यलेखक -

**(A)** बर्नार्ड शॉ
**(B)** चेखोव
**(C)** इब्सेन
**(D)** बरटोल्ड ब्रेख्त

**43.** 'सकाळचा अभ्यास' या नाटीकेचे लेखक -

**(A)** राम गणेश गडकरी
**(B)** श्रीपाद कृष्ण कोल्हेटकर
**(C)** वि . वी शिरवाडकर
**(D)** कृष्णाजी खाडीलकर

**44.** 'लिटल थिएटर' ही मुंबईतील संस्था स्थापक -

**(A)** दिलीप प्रभावळकर
**(B)** रत्नाकर मतकरी
**(C)** सुधा करमरकर
**(D)** विजय मेहता

**45.** आंगिक अभिनयातील शिल्पबद्धता हे महत्वपूर्ण वैशिष्ट्य असणारी रंगभूमी -

**(A)** बालरंगभूमी
**(B)** थिएटर ऑफ़ ऑप्रेस्ड
**(C)** वास्तववाद
**(D)** सर्व पर्यायी चूक

**46.** ऑगस्तो बोल यांच्या संकल्पेनवर आधारित कार्य करणारी नाट्यसंथा.

**(A)** जनसंस्कृती, बंगाल
**(B)** रेपरटरी थिएटर , मणिपूर
**(C)** थिएटर इन एजुकेशन , दिल्ली
**(D)** इप्टा, मुंबई

**47.** 'दुर्गा झाली गौरी' हे मराठी रंगभूमी वरील -

**(A)** संगीत नृत्य
**(B)** संगीत नृत्यमय नाट्य
**(C)** नृत्य नाट्य
**(D)** शोकनाट्य

**48.** कीर्तनातून कोणत्या अभिनयाचा वापर होत नाही -

**(A)** वाचिकाभिनय
**(B)** आंगिकाभिनय
**(C)** आहार्य अभिनय
**(D)** सर्व पर्यायी चूक

**49.** बालकांच्या विशिष्ट वयोगटाचे प्रतिनिधित्व करणारे तसेच त्या बालकांच्या संदर्भातील परिस्थिती प्रश्न व समस्यांचा विचार करणारे नाटक जे रंगभूमीवरील तज्ञाच्या मार्गदर्शनात सादर होते .

**(A)** ग्रिप्स रंगभूमी
**(B)** सामुदायिक रंगभूमी
**(C)** बालनाट्य स्पर्धा
**(D)** लोकनाटक

**50.** समाजतील शोषित अशा समूहाला अभिव्यक्तीची कृतिशील जाणीव करून देणारी रंगभूमी -

**(A)** थिएटर ऑफ क्रूएल्टी
**(B)** थिएटर ऑफ फेमिनीझम
**(C)** थिएटर ऑफ़ ऑप्रेस्ड
**(D)** एपिक थिएटर

********